# जिल्हा परिषद, चंद्रपूर शिक्षण विभाग (प्राथमिक)

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतंर्गत (पुर्वीची शालेय पोषण आहार योजना)

## डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज -2022

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक ............................. दिनांक ..................................

**प्रति,**

**सदस्य सचिव,**
**जिल्हा निवड प्रक्रिया समिती**
**तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

उमेदवराचा अलिकडच्या काळातील राजपत्रित अधिकारी यांनी साक्षांकित केलेला पासपोर्ट साईज फोटे

**विषय :- प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना सन 2022-23**
**डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज.**

1. उमेदवाराचे नाव :- श्री. श्रीम. ......................................................................................
   (आडनाव) (स्वत:चे नांव) (वडीलांचे /पतीचे नाव)
2. पत्रव्यवहाराचा पत्ता :- ...........................................................................................
   ...........................................................................................
   ...........................................................................................
3. जन्मतारीख (शालान्त प्रमाणपत्रानुसार) :- ..........................................................................
4. वय (दिनांक 31/07/2022 रोजी) ................... वर्ष ................... महिना...................दिवस
5. अर्जदाराराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षा मंडळ / विद्यापिठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 10 वी | | | | |
| 2. | 12 वी | | | | |
| 3. | पदवी | | | | |
| 4. | मराठी टंकलेखन | | | | |
| 5. | इंग्रजी टंकलेखन | | | | |
| 6. | एम.एस.सी.आय. टी. | | | | |

अनुभव :-

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | सेवा कालावधी (पासून-पर्यंत) | एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

6. अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती

1. ...................................... 2. ...................................... 3. ................................................

4. ...................................... 5. ...................................... 6. ................................................

7. धनाकर्ष तपशिल :- धनाकर्ष दिनांक ........................... धनाकर्ष क्रामंक ........................... रु. ..............

**प्रतिज्ञापत्र**

प्रमाणित करतो / करते की, सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड रद्द करण्यात यावी. त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक :-
स्थळ :- **(उमेदवाराची स्वाक्षरी)**

जाहिरात क्रमांक :- 01/2022

**जिल्हा परिषद, चंद्रपूर**
**शिक्षण विभग (प्राथमिक)**
**प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतंर्गत (पुर्वीची शालेय पोषण आहार योजना)**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत जिल्हा परिषदे अंतर्गत तालुकास्तरावरील रिक्त असणारी डेटा एन्ट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील 11 महिन्याचे कालावधी करिता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणारी रिक्त पदाची स्थिती खालील प्रमाणे.

1. **आरक्षण :- 6 पदाबाबत**

| प्रवर्ग | अनु. जाती | अनु. जमाती. | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | 0 | 2 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 6 |

2. **मासिक एकत्रित परिश्रमिक (मानधन) :-** प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतंर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचे मानधन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक2022/प्र.क्र.40/एस.डी.3 दिनांक 01 जून 2022 नुसार रक्कम रु. 20,650/- प्रमाणे देय राहील.

3. **शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता :-** 1) किमान इ. 12 वी पास 2) मराठी टायपिंग 30 श.प्र.मि. 3) इंग्रजी टायपिंग 40 श.प्र.मि. 4) MS-CIT किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असे बंधनकारक आहे.

4. **वयोमर्यादा :-**31/07/2022 अखेर सदर पदासाठी किमान 18 वर्ष व कमाल 43 वर्ष असणे बंधनकारक आहे.

5. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा.

6. **निवड पध्दती :-** महाराष्ट्र शासन, शालेय व क्रीडा विभाग व क्रीडा विभाग याचा शासन निर्णय क्रमांक शापोआ 2019/प्र.क्र.74/एस डी -3 दिनांक 29 ऑक्टोबर 2020 अन्वये खालील प्रमाणे निवड पध्दती.

अ) डाटा एन्ट्री ऑपरेटर्स पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास इ. 10 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी आणि इ. 12 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढण्यात येईल. तसेच एखादा उमेदवार पदवीधर असल्यास त्याला 10 गुण बोनस देण्यात येतील.

ब) अनुक्रमांक "अ" मध्ये विशद केल्याप्रमाणे गुणांकन करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परिक्षेकरीता एका पदासाठी गुणानुक्रमे 12 (1:12) उमेदवार याप्रमाणे बोलावण्यात येतील. सदर उमेदवारांची मराठी टायपिंग - 30 शब्द प्रति मिनिट व इंग्रजी टायपिंग - 40 शब्द प्रति मिनिट आणि संगणक ज्ञानाची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल. यासाठी सर्व मिळून 100 गुण देण्यात येतील. सदर प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये किमान 50 गुण प्राप्त होणारे उमेदवार "डाटा एन्ट्री ऑपरेटर्स" च्या पदावरील निवडीसाठी पात्र राहतील.

क) उमेदवारास संगणक परिक्षेमध्ये मिळालेल्या गुण (100 पैकी) व अनु. क्र. "अ" प्रमाणे शैक्षणिक पात्रते बाबत मिळालेल्या गुणांची बेरीज करुन एकूण गुण देण्यात येतील, व यानुसार उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्याप्रमणे तेवढ्याच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

ड) सदर पदासाठी **मुलाखत** घेण्यात येणार नाही.

MahaBharti.in

7. **उमेदवारासाठी सुचना :**

7.1 उमेदवारांनी विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. सदर अर्जाच्या पाकिटांवर "डेटा एन्ट्री ऑपरेटर" पदाकरिता अर्ज असे नमूद करावे. उमेदवाराने अर्ज सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे कार्यालयातील **"शालेय पोषण आहार कक्षात"** समक्ष किंवा अंतिम दिनांकाच्या पुर्वी पोस्टाने सुट्टीचे दिवस वगळून सादर करावेत.

7.2 अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय प्रमाणपत्र, प्रवर्ग निहाय जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, संदर्भातील कागदपात्रांच्या झेरॉक्स प्रती स्वसाक्षांकित करुन जोडाव्यात.

7.3 निवड झालेल्या उमेदवारांना प्रवर्ग निहाय 6 महिण्याच्या आंत जात वैद्यता प्रमाणपत्र (Caste Validity) सादर करणे बंधनकारक राहील

7.4 अर्जासोबत स्वत:चे पूर्ण नाव व पत्ता असलेला 4 X 6 आकाराचा असलेला रिकामा, रु 5/- पोस्टाचे तिकीट लावलेला लिफाफा पाठविण्यात यावा.

7.5 अर्ज करण्याची अंतिम तारीख **06/09/2022** असेल यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

7.6 उमेदवाराचा नियुक्ती कालावधी एक वर्षाचा राहिल व दरवर्षी उमेदवाराचे काम समाधानकारक असल्यास नियमानुसार एक दिवसाचा तांत्रिक सेवाखंड देवून पुर्ननियुक्ती देण्यात येईल.

7.7 नियुक्ती पुर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहीत नमुन्यात रु. 100/- चे स्टॅम्पपेपरवर करारनामा (बंधपत्र) करुन घेण्यात येईल, आणि त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती यासंबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

7.8 भरती प्रक्रियेबाबत तसेच उमेदवार पात्र व अपात्रता बाबतचा अंतिम निर्णय हा निवड प्रक्रिया समितीचा राहील.

7.9 कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल.

7.10 डोटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्यांस नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाही.

7.11 उमेदवारांनी अर्जासोबत रक्कम रु. 500/- चा धनाकर्ष (Demand Draft) जोडणे आवश्यक / अनिवार्य आहे, डिमांड ड्राफ्टच्या मागे स्वत:चे नांव, पत्ता स्वहस्ताक्षरात लिहावा.

7.12 सदरचा धनाकर्ष (Demand Draft) **शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या नावने देय असलेला असावा.**

7.13 परिपूर्ण अर्ज सादर करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. अपूर्ण माहिती असलेले अर्ज, आवश्यक कागदपत्र सलग्न नसलेला अर्ज व धानाकर्ष (Demand Draft) नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाही.

7.14 परीक्षेच्या वेळी येतांना आधारकार्ड, निवडणूक अयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायन्स यापैकी किमान 1 मुळ ओळखपत्र व छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

7.15 पात्र उमेदवारांची संगणक प्रात्याक्षिक व मराठी, इंग्रजी टंकलेखन परिक्षा ही संगणकीय प्रणाली मार्फत घेण्यात येईल.

MahaBharti.in

7.16 सदर भरतीची प्रक्रीया पूर्ण झालेनंतर एक वर्षाच्या आत एखादया ठिकाणी कंत्राटी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्याने पद रिक्त झालेस प्रतिक्षाधिन यादीवरील गुणानुक्रमाचे उमेदवारास नियुक्ती आदेश दिला जाईल. प्रतिक्षाधिन यादी एक वर्षासाठी ग्राहय धरणेत येईल.

7.17 सदर परीक्षेस बसण्यासाठी पात्र उमेदवाराची यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थाळावर प्रसिध्द करण्यात येईल.

7.18 भरती संबंधित नविन सुचना, परीक्षेचा दिनांक, वेळ व स्थळ, सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराची गुणानुक्रमे यादी याबाबत माहिती जिल्हा परिषदेच्या https://zpchandrapur.co.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. व्यक्तीश: अर्जदाराला संपर्क केला जाणार नाही. अर्जदाराने वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे आवश्यक आहे.

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड प्रक्रिया समिती**
**तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड प्रक्रिया समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

MahaBharti.in